# 2 भारतात ब्रिटीश सत्तेची स्थापना

## इंग्रज - फ्रेंच युद्ध (कर्नाटक युद्ध)


| युद्ध | कारणे | लढाई | तह |
|---|---|---|---|
| 1746-48(1) | ऑस्ट्रीयाचा वारसा हक्क | सेंटथोमे | एक्स-ला-शापेल |
| 1749-54(2) | भारतातील वारसा हक्क | अम्बर-अन्वरुद्दी खान (1749)<br>**अम्बर-(अ x डु + चं + मु)**<br>वुलवर-नसीरजंग (1750)<br>**वुलवर-(न x डु + चं + मु)**<br>त्रिचीनापल्ली (1753)<br>**त्रिचीनापल्ली-(रा x डु+चं+मु)** | पाँडेचरी (गॉडव्ह्यू)<br>अ = अन्वरुद्दी खान<br>डु = डुप्ले<br>न = नसीरजंग<br>मु = मुजफ्फर जंग |
| 1759-62(3) | युरोपातील सप्तवार्षिक युद्ध | तंजावर, वाँदीवॉश<br>(22 जाने.1760) | पॅरीस |

## इंग्रज-बंगाल संघर्ष

- बंगालची पार्श्वभूमी (1651 - बंगाल किनारा, हुगळी वखार)
- सुभेदार आजीम उशाने जामीनदारी - 1668
- 1717 - फर्रखुसियार विशेष अधिकार

**बंगालचे नवाब -**

1) मुर्शिद कुलीखान (1717-27) -
   बंगालचा दिवाण ते नवाब - तकावी - इजारापद्धत
2) शुजाउद्दीन (1727-39) (मुर्शि-जावाई)
   ↓ मुलगा
3) सरफराजखान (1739-40)
   ↓ सरदार
4) अलीवर्दी खान (1740-56) -
   तटबंदी बांधण्यास विरोध, विशेषाधिकारचा उपयोग
   ↓ नातू (मुलीचा मुलगा)
5) सिराज उद्दौला (1756-57)
   ↓ सेनापती
6) मीर जाफर (1757-59)
   ↓ जावाई
7) मीर कासीम (1759-63)
   ↓ सासरा
8) मीर जाफर (1763-65)



## इंग्रज-म्हैसूर युद्ध

- एकूण 4 युद्ध झाले.
- दिल्ली - मुघल. दक्षिणेत - विजयनगर आणि बहामनी.
- 1565 - तालकोटचे युद्ध (विजयनगर आणि बहामनी) विजयनगरचे तुकडे.

### विजयनगरचे साम्राज्य

- महमद तुघलकाच्या काळात दक्षिणेतील सरदारानी 1336 मध्ये विजयनगरचे राज्य स्थापन केले.
- कर्नाटकातील हंपीही राज्याची राजधानी होती.
- हरिहर हा पहिला राजा होता. तर बुक्काने राज्याचा विस्तार रामेश्वरपर्यंत केला.
- 1509 मध्ये विजयनगरचा राजा कृष्णदेवराय झाले.
- विजयवाडा, राजामहेंद्री हे प्रदेश यांनी जिंकून घेतले.
- अनेक ठिकाणी राममंदिर व विठ्ठलमंदिर उभारले.
- कृष्णदेवराय यांनी 'आमुक्तमाल्यदा' हा राजनितीविषयक ग्रंथ लिहला.
- विजयनगरचा शेवटचा राजा रामराय याचा अदिलशाही, कुतुबशाही, निजामशाही, बरीदशाही यांनी मिळून 1565 च्या तालकोटच्या लढाईत पराभव केला. विजयनगरचे राज्य संपुष्टात आले.

### बहमनी साम्राज्य

- हसन गंगुने महमद तुघलकाचे वर्चस्व झुगारुन इ.स. 1347 मध्ये बहमनी राज्याची स्थापना केली.
- कर्नाटकातील गुलबर्गाही या राज्याची राजधानी होती.
- महमदगवान हा राज्याचा उत्तम वजीर व प्रशासक होता.
- याने जमीन महसूल सुधारणा करुन राज्याला आर्थिक स्थैर्य प्राप्त करुन दिले होते.
- सैनिकांना जहागिरी ऐवजी रोख पगार दिली.
- बिदर येथे अरबी व फारशी विद्याच्या अभ्यासासाठी मदरसा स्थापन केली.
- महमद गवान नंतर बहमणी साम्राज्याच्यात गटबाजी झाली.

**बहमणी साम्राज्य** →
- व-हाड - इमादशाही
- बिदर - बरीदशाही
- अहमदनगर - निजामशाही
- विजापूर - अदिलशाही
- गोवळकोंडा - कुतुबशाही



## हैदर अली

**जन्म - 1720**

**मृत्यू - 6 डिसेंबर 1782**

**नोकरी** - हैदर अली कृष्णराज दुसरा याचा दिवाण नंदराजन याच्याकडे सैनिक म्हणून कार्य करत होता. परंतु कांही दिवसाने नंदराजन देवराज कृष्णराज दुसरा याला बाजुला करुन त्याने म्हैसुर संस्थानाची सत्ता काबीज केली.

**पदग्रहण** - 1761

**पदग्रहण मिळण्यासाठी तयार झालेली परिस्थिती -**
- पाणिपतची तिसरी लढाई
- इंग्रज-फ्रेंच संघर्ष



## टीपु सुलतान

**जन्म - 20 नोव्हेंबर 1750**

**मृत्यू - 4 मे 1799**
**(श्रीरंग पट्टनम)**

**आई** - फातीमा फक्रुसिन्रा

**वडील** - हैदर अली

**ओळख** - म्हैसुरचा वाघ म्हणतात.
भारतातील भारतीय बनावटीचे पहिले क्षेपनास्त्र तयार केले.

फ्रेंचाशी जवळीक वाढल्याने इंग्रज विरोधी मत तयार झाले. स्वाभीमानाशी तडजोड न केल्याने थोडयाच दिवसात पराभवाला सामोरे जावे लागले. कारण भारतातील इतर संस्थानीकांनी इंग्रजांना सहकार्य केले होते.

## इंग्रज - शीख

- 12 मिसल होती (राज्य). सुकरचाकियाचा प्रमुख महासिंगचा मुलगा रणजितसिंग. (1790 - दहा वर्षाचा असतांना)
- 1798 झामनशहाचे आक्रमण पण चिनाबमधील तोफा काढुन दिल्या म्हणुन राजा ही पदवी झामनशहाने रणजितसिंगाला दिली.
- 1806 - होळकराला मदत नाकारली. 1814 - नेपाळच्या राजाला मदत केली नाही. 1817 ला पेशव्याला मदत केली नाही.
- 1807 - लॉर्ड मिंटो ने संरक्षणात्मक करार करण्यासाठी दूत पाठवला (नेपोलियन भिती)
- 1809 - चा अमृतसर करार (25 एप्रिल). इंग्रज व शिख दोघातील सीमा सतलज.
- 1839 - रणजिंगाचा मृत्यू.
- कोहिनूर (शाहसूजा) - 1845-1846 कोहिनूर इंग्रजाकडे.

### प्रथम इंगज-शीख युद्ध (1845-46)

- मुदळी, फिरोजशहा, भैरोवाल, अलीवाल येथे लढाया झाल्या. लालसिंग (फितुर), तेजसिंग (फितुर) पळून इंग्रजांकडे गेले.
- दलीपसिंगावर इंग्रजांचे नियंत्रण.

### लाहोरचा तह (9 मार्च, 1846)

- सतलज नदीपलीकडील भाग इंग्रजांना मिळाला. ब्रिटिशांच्या परवानगीशिवाय युरोपियनांना प्रवेश नाही. पंजाबचा राजा दलिपसिंग, राणी जिंदाल, वजीर लालसिंग यांना पदमान्यता. लाहोरचा रेसिडंट् म्हणून हेन्री लॉरेन्स याला मान्यता.

### दुसरे इंग्रज-शीख युद्ध (1848-49)

- तोफाची लढाई (फेब्रुवारी, 1849) - चिनाब नदीजवळ.
  (मोखनचंद, देवानचंद, हरिसिंग या कर्तबगारी सेनापतींचा मृत्यू.)
- 29 मार्च, 1849 पंजाबचे विलनीकरण केले. (डलहौसी)
- मार्च, 1853 दलीपसिंगने ख्रिश्चन धर्म स्वीकारला, राणी जिंदनचे नेपाळला पलायन. (1863 निधन, नाशिकला अत्यंसंस्कार)
- 1888 - राजा दलीपसिंगाने शिख धर्माचा स्वीकार केला. 23 ऑक्टोबर, 1893 निधन.

### महाराजा रणजितसिंग (1780 - 1839)

- **ओळख -** शेर-ए-पंजाब / पंजाबचा सिंह.
- **राजा -** 12 एप्रिल, 1801
- **राजधानी -** लाहोर
- **वडील -** महासिंग
- **आई -** राजकौर
- **धर्म -** शीख
- **सेना -** शीख खालसा सेना.
- **मुले -** खडकसिंग, ईशरसिंग, शेरसिंग, काश्मिरासिंग, पेशौरासिंग, मुल्तानसिंग, दलीपसिंग



### शिखांचे राजे

- **रणजितसिंग -** 1801-1839

↓

- **खडगसिंग -** 1839-1840 (दुबळा, मतिमंद, अफुचे वेसन)

↓

- **नौनिहालसिंग -** 1840 (किल्ल्याचे दार कोसळले)

↓

- **शेरसिंग -** 1841-43

↓

- **दलिपसिंग -** 1843-49

### शिखांच्या प्रशासनातील गुण व दोष

**गुण**

- लष्कर युरोपियन पद्धतीचे होते.
- फौज-ए-खास
- पायलदल प्रमुख - जनरल वेन्चुरा
- घोडदल प्रमुख - अलार्ड
- परराष्ट्रमंत्री - अजीजुद्दीन
- जमादार - खुशालसिंग, तेजसिंग (डोगरा बंधू कश्मिर)

**दोष**

- अकार्यक्षम प्रशासन. (मर्जीतील अधिकाऱ्यांना पद)
- शीख प्रमुख पदावर नव्हते. (लालसिंग, तेजसिंग)
- सैनिकांचा पगार वेळेवर नव्हता.

## इंग्रज-अफगाणिस्तान युद्ध

| अ.क्र. | युद्ध | गव्हर्नर | वैशिष्ट्ये |
|---|---|---|---|
| 1. | 1838-1842 | लॉर्ड ऑकलँड व लॉर्ड एलनबरो | नेतृत्व - जॉन किंग<br>डिसेंबर 1841, अकबरखानशी करार,<br>सप्टेंबर 1842 जनरल नॉट व पोलक यांनी अफगान जिंकले. |
| 2. | 1878-1880 | लॉर्ड लिटन | रशियाच्या शक्तीला आळा घालण्यासाठी युद्ध.<br>शेर अली सोबत करार x लईस वेली<br>गंडकमचा करार. याकुमखाँ व इंग्रज. |
| 3. | 1919 | लॉर्ड चेम्सफोर्ड | पंचदेह प्रकरणामुळे युद्ध झाले. (रशिया) |

## इंग्रज-ब्रह्मदेश युद्ध

**इंग्रजांनी ब्रम्हदेशासोबत खालील कारणास्तव युध्द केले.**

1. फ्रेंचाचा कायमचा बंदोबस्त करायचा होता.
2. पुर्व आशियात आपले वर्चस्व सिध्द करावयाचे होते.
3. ब्रम्हदेशातील टींबर मार्केटचा उपयोग करुन घ्यायचा होता.

| अ.क्र. | युद्ध | गव्हर्नर | वैशिष्ट्ये |
|---|---|---|---|
| 1. | 1824-1828 | लॉर्ड ॲमहर्स्ट | आराकन व तेनासरीम हा प्रदेश मिळाला. |
| 2. | 1852 | लॉर्ड डलहौसी | पेगूप्रांत - टिंबर मिळाले (राजा - थरावदी) |
| 3. | 1885 | लॉर्ड डफरीन | राजा-थिबा- संपूर्ण ब्रह्मदेशत ताब्यात.<br>बॉम्बे वर्मा ट्रेडिंग कॉर्पोरेशन स्थापना - 1885. |